शैक्षणिक संदर्भ अंक १२२ फेब्रुवारी - मार्च २०२०

# महिलांद्वारे मराठी विकिपिडियावर ज्ञान निर्मिती

# महिलांद्वारे मराठी विकिपिडियावर ज्ञान निर्मिती

विकिपिडिया हा एक लोकसहभागातून लोकांसाठी निर्माण केलेला मुक्त ज्ञान स्रोत आहे. विकिपिडियाची सुरूवात जरी इंग्रजी भाषेत झाली असली, तरी इतर भाषांमध्ये मुक्त स्वरूपात ज्ञान उपलब्ध करून देण्यासाठीही ह्या व्यासपीठाचा उपयोग होतो आहे. मात्र त्यासाठी वेगवेगळ्या भाषिकांनी यात रस घेऊन योगदान देणे आवश्यक आहे.

उपलब्ध ज्ञानसाठा पहाता इंग्रजी तसेच इतरही विविध भाषांच्या तुलनेत मराठी विकिपिडिया अजूनही बऱ्यापैकी बाल्यावस्थेत आहे. त्यातही महिलांचे योगदान खूपच कमी आहे. जागतिक महिलादिनानिमित्त महिलांनी एकत्र येऊन विकिपिडियावर विविध प्रकारे ज्ञाननिर्मिती करावी, यासाठी उपक्रम राबवले जातात.

शनिवार ७ मार्च २०२० रोजी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ व सेंटर फॉर इंटरनेट अँड सोसायटी यांच्यासह समुचित एन्व्हायरो टेक यांनी महिला संपादकांच्या पुढाकारातून मराठी विकिपिडियावर जागतिक वातावरण बदल या विषयाशी संबंधित नोंदी तयार करण्याचे काम सुरू केले. यासाठी एक दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. विकिपिडियावर ज्ञान निर्मिती करण्यासाठी तज्ञ म्हणून सुबोध कुलकर्णी व जागतिक वातावरण बदल या विषयातील तज्ञ म्हणून प्रियदर्शिनी कर्वे यांनी मार्गदर्शन केले. महाराष्ट्र

ज्ञान महामंडळाने कार्यशाळेसाठी सर्व व्यवस्था उपलब्ध करून दिली. वीस महिला संपादक या कार्यशाळेत सहभागी झाल्या.



कार्यशाळेत सहभागी सर्वांनी प्रथम विकिपिडियावर ज्ञान निर्मिती करण्याबाबत प्राथमिक माहिती समजून घेतली. मग जागतिक वातावरण बदलाशी संबंधित उपलब्ध माहितीचा आढावा घेतला गेला, व कोणत्या विषयांवर नोंदी करणे गरजेचे आहे, त्यावर चर्चा केली. सर्वांनी आपापसात विषयांची वाटणी करून घेतली व कामाला सुरूवात केली.

कार्यशाळा संपण्यापूर्वी प्राथमिक स्वरूपात दोन नोंदी विकिपिडियावर तयार झाल्या, व इतर १८ नोंदीवर प्राथमिक काम झाले. शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकातर्फे जागतिक वातावरण बदल या विषयाशी संबंधित आत्तापर्यंत प्रकाशित झालेले लेख इ-पुस्तकरूपात विकीस्रोतवर उपलब्ध करून देण्याच्या कामालाही या दिवशी सुरूवात झाली.

या उपक्रमात केवळ महिलाच नाहीतर सर्वजण सहभागी होऊ शकतात. जागतिक वातावरण बदल हे या शतकातील मानवापुढील सर्वात मोठे आव्हान आहे. त्यामुळे याबाबतची निरपेक्ष ज्ञानकोशीय स्वरूपाची माहिती विविध भाषांमधून सर्वसामान्यांना उपलब्ध होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे हे काम पुढेही चालू रहाणारच आहे. सहभागी होण्यात इच्छुकांनी pkarve@samuchit.com या इमेलवर कळवावे. एप्रिलमध्ये आणखी एक कार्यशाळा घेण्याचा विचार आहे. यामध्ये झालेल्या कामाचा आढावा घेतला जाईल, आणि नव्या सहभागींना मार्गदर्शन केले जाईल.




७ मार्चच्या कार्यशाळेबद्दल अधिक माहितीसाठी पहा - वातावरण बदल संपादन कार्यशाळा

§§§

---